# सामाजिक सुधारणेचे अग्रदूत – महात्मा ज्योतीबा फुले

**प्रा. डॉ. कल्पना मो. सांगोडे**
शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय
अर्जुनी/मोर. जि. गोंदिया

---

भारतीय सामाजिक क्रांतीचे प्रणेते, समाज सुधारक, समाजप्रबोधक, महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे, समानता आणि सत्यासाठी देह झिजवणारे, बहुजणांचे उध्दारक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि थोर विचारवंत क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले शिक्षणाचे महत्व पटवून देतांना...

विद्येविना मती गेली
मती विना नीती गेली
नीती विना गती गेली
गती विना वित्त गेले
वित्त विना शुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले

असे विचार मांडणारे म. ज्योतिबा फुले हे आद्य शिक्षणतज्ञ होत. त्यांनी शूद्र अति शूद्र बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र आणि समाजातील जातीभेद जवळून पाहिलेला असल्याने तसेच स्त्रीयांना त्यांच्या शारिरीक व मानसिक गुलामगिरीतून बाहेर काढायचे असेल तर, त्यांचा सर्वांगिण विकास करायचा असेल तर “शिक्षण” हेच त्यावरील रामबाण उपाय आहे. असे त्यांना वाटु लागले. त्यासाठी त्यांनी सर्वप्रथम स्त्रियांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला.

**स्त्री शिक्षणाचे कार्य :**

1) जानेवारी 1848 रोजी मुलींसाठी पहिली शाळा काढली, या शाळेत 6 मुली होत्या. 4 ब्राम्हण , 1 धनगर व 1 मराठा.
2) 15 मे 1848 रोजी शुद्रासाठी पहिली शाळा काढुन ज्योतिबा सावित्रींनी ज्ञानाचा दिप उजळला.
3) 1851 मध्ये त्यांच्या शाळेतल्या मुलींची परिक्षा घेण्यात आली त्यावेळी मेजर कॅन्डी यांनी शेरा दिला व शाळेतील मुलींची बुध्दीमत्ता आणि प्रगती पाहुन त्यांना फार समाधान वाटले.
4) 1851 साली मुलींची दुसरी शाळा रास्तापेठेत काढली, इंग्रज सरकारानेही ज्योतीरावांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा सत्कार केला.
5) मुलींच्या शिक्षणासाठी 1853 मध्ये तिसरी शाळा वेताळपेठेत काढली.
6) कष्टकरी लोकांच्या शिक्षणाकरिता रात्रीची शाळा काढली ज्योतीरावांनी एकुण सर्वांसाठी तीन मुलीच्या शाळा आणि महारमांग मुलींसाठी आणखी तीन शाळा अशा एकूण 6 शाळा स्त्रिया आणि शुद्रासाठी काढल्या.

Research Hub International Journal

7) ज्योतीरावाने इ.स. 1848 ते 1852 पर्यंत त्यांनी पुणे शहर व इतर गावात जवळ जवळ 18 शाळा काढल्या.

**स्त्री उध्दाराचे कार्य :**

**1) विधवांच्या केशवपन प्रथेला विरोध :**

विधवांचे केशवपन करुन सुकेशनी स्त्रियांना विद्रुप करण्याची केशवपन किळसवाणी कूप्रथा त्या काळात होती. विधवांच्या डोक्यावरील केश कापुन त्यांना विद्रुप बनविणारी केशवपन प्रथा मोडुन काढण्याकरिता ज्योतीरावाने पुण्यातील नाभिकांच्या संप घडवुन आणला . त्यामुळे "आम्ही विधवांच्या डोक्यावरील केस कापणार नाही" अशी भुमिका नाभिकांनी घेतली. तत्कालिन सनातन्या विरुध्द उचललेले हे म. ज्योतीरावाचे अत्यंत क्रांतीकारक पाऊल होते. तसेच मुंबईत न्हाव्यांच्या परिषदेत केशवपन न करण्याचा ठराव पारीत करुन घेतला व स्त्रियांना सन्मान प्राप्त करुन दिला.

**2) विधवा पुनर्विवाह कायदाचे समर्थन :**

त्या काळात बालविवाह होत असत त्यामुळे पती निधनानंतर बालविधवा होत. विधवांना पुनर्विवाह करण्याचा हक्क नाकारल्यामुळे त्यांना असंख्य यातना भोगाव्या लागत असे. विधवांच्या पुनर्विवाहाला जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणुन आक्टोबर 1853 मध्ये एक सभा भरविण्यात आली. सुधारकांना विरोध करण्यासाठी सनातनी शास्त्री मंडळीही मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. त्यांनी वाद विवाद करुन ती सभा उधळुन लावली. परंतु ज्योतीरावाच्या प्रयत्नांने 1856 साली सरकारने 'विधवा पुनर्विवाहाचा कायदा' संमत केला. आणि स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळवुन दिले.

**3) प्रसुती गृह व बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :**

त्या काळात जरठबाला विवाह, बालविवाह प्रथा होती. त्या काळात साथीचे रोग येत असत. त्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या तरुण बायका विधवा होत. विधवांना सक्तीचे-वैधव्याचे जीवन जगावे लागे. या तरुण विधवा हरिदास, पुराणिक किंवा कोणा तरी जवळच्या नातेवाईकाच्या वासनेस बळी पडत. गरोदर राहत. आपली समाजात बदनामी होईल म्हणून जन्मास आलेले मूल कोठे तरी फेकून देत. जोतिरावांनी हे चित्र पाहिले होते म्हणून त्यांनी आपल्या घरीच प्रसुतीगृह व बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले (इ.स १८६३). त्यांनी आपल्या दारावर पाटीच लावली होती - 'विधवांनो, येथे या सुरक्षितपणे बाळंत व्हा. सर्व काही गुप्त ठेवले जाईल व मुलांचेही संगोपन केले जाईल.' याकाळी त्यांना लोकहितवादी, रा. गो. भांडारकर, बाबा परमानंद, तुकाराम तात्या पडवळ यांचे सहकार्य लाभले. या संस्थेच्या कार्यात सावित्रीबाईंचा सक्रीय सहभाग होता.

**4) अनाथ बालिकाश्रम गृहाची स्थापना :**

म. फुलांच्या विधवांच्या प्रसुतीगृहा बरोबरच अनाथ बालिकाश्रमाची स्थापना करुन ते चलविले व अनेक अनाथ मुलींची राहण्याची सोय करुन त्या काळात मानवतावादी कार्य केले.

**5) नियोग पध्दतीला विरोध :**

त्या काळात जरठ बाला विवाह पध्दती होती. पती निधनानंतर अनेक स्त्रिया विधवा होत त्यामुळे विधवा

Research Hub International Journal

भावजयीशी लग्नविधी न करता केवळ संतती होण्यासाठी तिच्याशी संबंध ठेवण्याच्या पध्दतीला नियोग असे म्हणत. या पध्दतीवर त्यांनी प्रखर टिका केली. पहिली पत्नी आवडेनाशी झाली की, केवळ कामपुर्तीसाठी 3-4 बायका पुरुष करतात पण लग्नानंतर नवरा दुर्व्यसनी आहे म्हणुन पत्नीने दुसरे लग्नकरावे असे कोठे ही ग्रंथात लिहिलेले नाही. तरी सुध्दा पुरुष असे का करतात असा सवाल म. फुले करतात.

### 6) बालविवाह प्रथेस विरोध :

त्या काळात बाला- जरठ विवाह पध्दती होती, 50-60 वर्षे वयाच्या पुरुषांशी अत्यंत सुंदर व अज्ञात मुलींची लग्ने होत असत. त्यावर म. फुलेनी कडाडुन टिका केली. स्त्री – पुरुषांची शारिरीक व मानसिक वाढ पुरेशी झालेली नसताना होणारे बालविवाह त्यांच्या प्रकृतीला हानीकारक आहेत, तसेच होणाऱ्या संततीलाही त्यांचे परिणाम भोगावे लागतात. त्यामुळे बालविवाहास विरोध करुन प्रौढ विवाहासाठी आग्रह धरला. प्रौढ विवाहास आग्रह धरणारे म. ज्योतिबा फुले हे पहिलेच समाजसुधारक होते.

### 7) विधवेचा पुत्र दत्तक घेतला :

जोतिरावांना मूलबाळ नव्हते. वंशवेल कायम राहावी म्हणून दुसरे लग्न करण्याचा सल्ला त्यांचे वडील व नातेवाइकांनी दिला होता; पण तो त्यांनी धुडकावला. काशीबाई नावाची एक ब्राह्मण बालविधवा त्यांच्या बालहत्या प्रतिबंधकगृहात बाळंत झाली होती. तिला पुत्र झाला. यशवंत त्याचे नाव ठेवले. त्याला फुले यांनी दत्तक घेतले होते. त्या मुलाचे शिक्षण, संगोपन केले व शेवटी त्याच्या नावे मृत्युपत्र करून ठेवले. यशवंत डॉक्टर झाला होता. ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्मास आलेल्या यशवंतचे लग्न ही एक मोठी समस्याच होती. हडपसरचे ग्यानबा कृष्ण ससाणे यांची मुलगी राधा हिच्याशी यशवंतचा विवाह झाला (इ.स. १८८९). त्याचे लग्न हे सत्यशोधक विवाहपद्धतीनुसार झाले होते. हे पहिले आंतरजातिय विवाह म. फुले यांनी करुन दिले.

### 8) अस्पृश्यांसाठी स्वतःची पाण्याची विहीर दिली :

उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची टंचाई भासत असे. अस्पृश्यांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होत असत. हे विचारात घेऊन म. फुले यांनी स्वतःची पाण्याची विहीर (हौद) अस्पृश्यांसाठी खुली करून दिली. त्या काळाचा संदर्भ पाहता तत्कालिन परिस्थितीचा विचार करता म. फुलेनी हे अत्यंत क्रांतिकारक पाऊले उचलले होते.

### 9) सत्यशोधक विवाहपद्धतीचा पुरस्कार :

म. फुले यांनी ही एक अभिनव व नावीन्यपूर्ण विवाहपद्धत रूढ केली. या विवाहास ब्राह्मण बोलावला जात नसे. देव व माणूस यांच्यातील मध्यस्थच फुले यांनी नाकारला होता. त्यांनी ब्राह्मणांच्या गैरहजरीत लग्ने लावण्याचा आग्रह धरला. सत्यशोधक विवाहात २-२ मंगलाष्टके वधू-वराने म्हणावयाच्या व ५ वी उपस्थितांनी म्हणायची पद्धत होती. विवाहानंतर अंध, अपंगांना वधुपित्याने मदत करावी तसेच स्कूल फंडास मदत करावी अशी अपेक्षा असे. हुंडा, उधळपट्टी, मुहूर्त पत्रिका, घरभरणी, जात, धर्म यास या विवाहपद्धतीत स्थान नव्हते. या विवाहास गावातील सर्व जातिधर्मांचे लोक उपस्थित राहावेत हेही त्यांना अभिप्रेत होते. स्वतः जोतिरावांनी सत्यशोधक पद्धतीने अनेक विवाह लावले होते. विवाहासारख्या बंदिस्त व चाकोरीबद्ध संस्थेत परिवर्तन करण्याचा त्यांचा विचार

होता.

**१०) मद्यपानास विरोध :**

फुले यांच्या विचारास प्रत्यक्ष कृतीची जोड होती. पुण्यातील मद्यपानगृहात वाढ करण्याच्या सरकारी धोरणास विरोध करणारे पत्र फुले यांनी पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाला १८ जुलै १८८० रोजी लिहिले. त्यात पुणे शहरात भरवस्तीत दारूचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अधःपतनाची सर्व बीजे पेरली जात आहेत, लोकांच्या आरोग्यालाही अपाय होत आहे, अनेक कुटुंबांचा सर्वनाश झाला आहे हे स्पष्ट करून नगरपालिकेने या दारू गुत्त्यांवर ते ज्या प्रमाणात हानी करतात त्या प्रमाणात कर बसवावा असे म्हटले होते. मद्य वर्ज्य करून तो पैसा लोकांनी ग्रंथखरेदीत गुंतवावा असे आवाहनही त्यांनी केले होते.

**11) वाचनालय काढले :**

विद्येत मागासलेल्या लोकांसाठी इ.स.१८५२ मध्ये जोतिरावांनी एक वाचनालय काढलेहोते व अभ्यास करण्याची सोय केली.

**सारांश :**

म. ज्योतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्राच्या मुलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रणेते मानले जातात. हिंदु समाजातील शूद्रातिशूद्राच्या व्यथा त्यांनी बोलून दाखविल्या. स्त्री शिक्षण बालविवाह, विधवा पुनर्विवाह, बालजरठ विवाह, केशवपन इ. स्त्रीदास्य, निर्मुलनावर आपले लक्ष केंदित करुन समाजात न्याय व समता यावर आधारलेली आदर्शसमाजरचनाअस्तित्वात आणण्याचा ध्येयवाद सांगितला.

त्यांनी शूद्रातिशूद्राच्या मुलामुलींसाठी शाळा काढुन ज्ञानाचे दालन खुले केले व त्यांची स्त्रीदास्यातून सुटका केली. याशिवाय त्यांनी ब्राम्हणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांच्या असुड, सार्वजनिक सत्यधर्म इ. साहित्य निर्माण करुन समाजातील शोषणाच्या प्रवृतीवर घणाघाती प्रहार केले. म्हणूनच या कार्यामुळे महाराष्ट्रातील 'समाजिक क्रांतीचे प्रणेते' म्हणून जनमाणसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. आणि जनतेने त्यांना "महात्मा" बनविले.

सत्याचा पालनवाला, हा धन्य ज्योतिबा झाला !

पतिताचा पालनवाला, हा धन्य महात्मा झाला !

अशी त्यांची गुणवंदना शिक्षण महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केली आहे. म. ज्योतिबा फुले ज्या कुप्रथेवर प्रहार करुन शिक्षण देण्यास प्रारंभ केला त्यामुळे आज स्त्रियांनी अनेक क्षेत्रात दैदिप्यमान प्रगती केली आहे. प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत, याचे श्रेय म. ज्योतिबा फुल्यांना व सावित्रीबाई फुल्यांना जाते.

**संदर्भ :**


- किर धनंजय – महात्मा ज्योतीराव फुले. ' आमच्या समाज क्रांतीचे जनक – पापुलर प्रकाशमान, मुंबई
- नाईकवाडे डॉ. अशोक – युग प्रवर्तक महात्मा फुले गौरव ग्रंथ – विद्याभारती प्रकाशन लातुर


Research Hub International Journal

- कुलकर्णी अ.रा. - महात्मा ज्योतीराव फुले, सामाजिक व शैक्षणिक कार्य – डायमंड पब्लिकेशन प्रथम आवृती जूलै 2006
- गाठाळ प्राचार्य डॉ. एस. एस. – आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – कैलाश पब्लिकेशन – औरंगाबाद.


Research Hub International Journal